मा. कुलसचिव यांचे कार्यालय
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
आवक क्र. 4608
दिनांक : 26.07.2025
26.07.2025

मा. कुलगुरु यांचे कार्यालय
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
2_ JUL 2025
3754
26 JUL 2025

विद्यार्थी विकास मंडळ
आवक क्र. 2351
28 JUL 2025
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

श्री अनिकेत अंकुश यादव,
पत्ता-१३१२, सदाशिव पेठ, पुणे ४११०३०.
मोबाईल नं. ७५८८२९१४८३.
शिवशक ३५२, दि. २५/७/२०२५

प्रति,

मा. कुलगुरु,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
यांसी स.न.वि.वि.

विषय :- आपली वेळ मिळणेबाबत.

संदर्भ :- देशभक्तीपर व समाजप्रबोधनपर माहितीपट सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये दाखविणेसंदर्भात.

आदरणीय महोदय,

आम्ही ऐतिहासिक, शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात काम करीत असून महाराष्ट्रातील विविध ठिकाणी प्रबोधनपर व्याख्याने, प्रदर्शने व उपक्रमांचे आयोजन करतो. याशिवाय इतिहास, गड-किल्ले, क्रांतिकारक, समाजप्रबोधनपर विषयांवर ग्रंथ लेखन केलेले आहे. ४००० स्वातंत्र्यसैनिकांची माहिती असलेला 'आझादी के दिवाने' हा ग्रंथ आम्ही प्रसिद्ध केलेला आहे. याशिवाय स्वातंत्र्यसैनिकांच्या कथा आणि व्यथा नवीन पिढीसमोर येण्यासाठी प्रदर्शने व व्याख्याने आयोजित करतो.

आपल्या स्वातंत्र्यसैनिकांनी, महापुरुषांनी या देशासाठी अनेक यातना सहन केल्या आहेत, संपूर्ण आयुष्य वेचले आहे. प्रसंगी प्राणत्याग देखील केला आहे. या असीम त्यागाचे विस्मरण मात्र फार झपाट्याने होत आहे. आपला देश वैभवशाली होण्यासाठी सर्वांना मिळून काम करावे लागणार आहे. याच उदात्त हेतूने आम्ही महाराष्ट्रातील सर्व वयोगटाचे विद्यार्थी, युवक व सर्वांसाठी **'आपण देशासाठी काय करू शकतो?'** या नावाने **समाजप्रबोधनपर माहितीपट (फिल्म)** बनविली आहे. **१५ मिनीटांच्या या माहितीपटात सद्यस्थिती, काही क्रांतीकारी घटनांचे वर्णन, भारताला मिळालेले स्वातंत्र्य, आपल्यापुढील प्रश्न/समस्या आणि आता आपण देशासाठी काय करायला हवे याचे वर्णन** आहे. ही फिल्म पाहून झाल्यानंतर त्यावर आधारीत वयोगटाप्रमाणे प्रश्नमंजुषा देखील असणार आहे. प्रत्येकाने ही फिल्म काळजीपूर्वक पहावी, हा या प्रश्नमंजुषेमागचा उद्देश आहे. प्रश्नमंजुषा सोडविल्यानंतर प्रत्येक सहभागी व्यक्तीस प्रमाणपत्र देखील ईमेल द्वारे मिळू शकेल. ही फिल्म आमच्याकडून सर्वांना विनामूल्य दाखविण्यात येणार आहे.

तरी आपणांस नम्रतेची विनंती की, आपल्या विभागाअंतर्गत येणाऱ्या सर्व शाळा, महाविद्यालये, सर्व संस्थांमध्ये ही समाजप्रबोधनपर फिल्म दाखविणेसंदर्भात आपली वेळ मिळावी, ही विनंती.

आपला,

अनिकेत

श्री. अनिकेत अंकुश यादव